Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mr. Bharati Sonawane - Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)
Dr. Munaf Shaikh, Jalgaon (Urdu)

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

Visit to - www.researchjourney.net SWATIDHAN PUBLICATION

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

**SPECIAL ISSUE – 130 (B)**

Title of the issue : **The Role of Government to protect the Human Rights**

**SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS**

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 400/-

**PUBLISHED BY**

Mrs. Swati Dhanraj Sonawane,

Director, Swatidhan International Publications, Nashik

**PRINTED BY**

Mrs. Swati Dhanraj Sonawane,

Director, Swatidhan International Publications, Nashik

EDITION :

April 2019

PRICE : 400 /-

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 130 (B) | March 2019 | UGC Approved No. 40705

20. व्यवसायाचे समाजिक उत्तरदायित्त्व 56
प्रा.डॉ.बाजीराव माणिकराव पाटील

21. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्ये 58
श्री.डॉ.सुदर्शन व्यंकटराव सोनवणे

22. "साहित्य में वैश्वीकरण की प्रासंगिकता" (विशेष संदर्भ - ममता कालीयाका दौड उपन्यास) 60
प्रा.डॉ.जाधव के.के.

23. स्वच्छ भारत अभियान प्रभाव एवं कठिनाईयाँ 62
श्रीमती टीना जोशी

24. सेंद्रिय शेतीची अपरिहार्यता 69
प्रा. बी. एस. जोगदंड

25. धारकर पवार घराण्यातील उदाजीराव पवारांचे कार्य 72
प्रा.डॉ.सुनिल रजपूत

26. पंडित जवाहरलाल नेहरू यांचे आलिप्ततावादी धोरण आणि पंचशील तत्वे 74
डॉ. संतोष बाबुराव कु–हे

27. दलित स्त्री और दोहरा अभिशाप 76
डॉ. मोहनन वी टी वी

28. सामाजिक संशोधन आणि अर्थशास्त्रीय संशोधन पध्दती एक अभ्यास 79
डॉ. सुरेश भा. ढाके

29. 'दशावतारचरितम्' के महाकाव्यत्व में आचार्य क्षेमेन्द्र का पाण्डित्य' 82
महेष दत्त शर्मा

30. 86

31. स्त्री सबलीकरण काळाची गरज 88
डॉ.एस.पी. गायकवाड

32. महाकवी अश्वघोष लिखित महाकाव्यातील स्त्रीविषयक विचार 91
श्रीमती. मुदलियार शकुंतला रामन

33. हिन्दी स्त्रीवादी साहित्य में विद्रोह का स्वर 94
डॉ. शेषराव लिंबाजी राठोड

34. 'लीळाचरित्र' ग्रंथातून चक्रधर स्वामींनी सांगितलेला उपदेश 97
डॉ. सूर्यवंशी रामहरी मधुकर

35. नांदेड जिल्हयातील आदिवासी लोकसंख्येचे जमातीनिहाय लिंगगुणोत्तराचा भौगोलिक अभ्यास (२०११) 99
देवकर आनंदा मारोती , डॉ. एस. व्हि. ताठे

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 130 (B) | March 2019 | UGC Approved No. 40705

# स्त्री सबलीकरण काळाची गरज

**डॉ.एस.पी. गायकवाड**
प्राचार्य, दयानंद कला महाविद्यालय,लातूर

---

वाढत जाणारे स्त्री अत्याचाराचे प्रमाण, स्त्री-भ्रूण हत्येचे वाढते प्रमाण ब यातून समाजव्यवस्थेमध्ये कमालीची अवस्थता पसरली आहे. स्त्रियांच्या जगण्याचा हक्क हिरावला जात आहे. वाढत जाणारी उपभोगतावादी प्रवृत्ती व त्यातून घडून येणारे बलात्काराचे प्रमाण यामुळे भारतातील स्त्री-जीवन कमालीचे असुरक्षित झाले आहे. भारतातील स्त्री चळवळीने स्त्री-प्रश्नावर आवाज उठविला. स्त्रीला माणूस म्हणून जगण्यासाठी समानतेचा लढा उभारला. स्त्रियांना संघटित करण्यात मोलाचे कार्य केले. त्यातूनच महिलांच्या सबलीकरणाला वेग देण्याचा प्रयत्न करण्यात आला. आधुनिक काळात जागतिकीकरणामुळे स्त्रियांना नवे आव्हान, नवीन संधी प्राप्त झाली. 'चूल आणि मूल' संकल्पना मोडीत निघाली, तिला नवीन क्षितिजे मिळाली. असे असले तरी स्त्रियांचे सबलीकरण झाले आहे असे म्हणता येणार नाही. कारण एकीकडे स्त्रीने कर्तत्व सिद्ध करून दाखविले असले तरी हजारोंच्या संख्येने स्त्रिया उपेक्षितच जीवन जगत आहेत. परंपरेने आणि समाजाने घालून दिलेल्या बंधनात तिचे जीवन बंदिस्त झाले आहे. शिक्षणक्षेत्रात तसेच जीवनातील प्रत्येक क्षेत्रात स्त्री पुढे येत असली तरी स्त्रियांना कुटुंबात किंवा समाजातच नव्हे तर त्यांच्या कामाच्या व्यवसायाच्या क्षेत्रात लिंगाधारित दुय्यमत्व जाणवून देण्याच्या प्रवृत्ती कमी झालेल्या नाहीत. त्यामुळेच स्त्रियांना सर्वांगीण विकासासाठी सुरक्षितता व संधी मिळत नाही. क्षमता असूनही संधी मिळत नाही. ही परिस्थिती बदलण्यासाठी स्त्रीचे खऱ्या अर्थाने विकासात्मक सबलीकरण होणे गरजेचे आहे. स्त्री-विकासात्मक सबलीकरण म्हणजे विकासाच्या संधीपासून वंचित असलेल्या मागास व दुर्बल स्त्रीच्या शारीरिक, आर्थिक, मानसिक, भावनिक, सामाजिक व सांस्कृतिक, सुस्थितीसाठी त्यांच्या क्षमतावर्धनातील अडथळे दूर करणे, त्यासाठी स्त्रीला सामाजिक, आर्थिक, राजकीय, प्रशासकीय क्षेत्रात योग्य प्रमाणात सहभागी करून निर्णयप्रक्रियेत सामील करून घेणे म्हणजे सबलीकरण होय.

भारतीय स्त्रियांची आजची समाजातील स्थिती व स्थान पाहता भारतीय परंपरेत व संस्कृतीत ते शोधावे लागते. विविध संस्कृती, परंपरा, रुढी, प्रथा यांनी नटलेल्या या समाजात प्राचीन काळी स्त्रियांचे स्थान गौरणीय पूजनीय होते. तिला शिक्षण, धर्म, राजकीय, सामाजिक तसेच संपत्तीतील उत्तराधिकार प्राप्त झाले होते. धर्म आणि कर्मकांड हे पत्नी (अर्धांगिनीशिवाय) पूर्ण होत नव्हते. तसेच स्त्रीशिवाय पुरुषाचे जीवन अपूर्ण आहे अशीच धारणा होती. स्त्रीला वेदाभ्यासाचे स्वातंत्र्य होते. तसेच धर्म, तत्त्वज्ञान, विश्वाची उत्पत्ती इत्यादी गहन आणि जटील विषयांवर पुरुषांच्या बरोबरीने वादविवाद करणाऱ्या स्त्रिया होत्या. याज्ञवल्कल्य आणि गर्गी, मैत्रेयी, शंकराचार्य आणि मैत्रयी असे वादविवाद गाजलेले आहेत. परंतु त्यानंतर मनूच्या आचारसंहितेने मात्र स्त्रीचे जीवन बंदिस्त करण्यात आले. तिला शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले. तिने जर वेदाचा अभ्यास केला तर तिच्या वडिलाच्या ताटात कीडे पडतील अशा समजूती रचण्यात आल्या. स्त्री म्हणजे पापयोनी व भोगण्याची वस्तू मानण्यात आली. सामाजिक, आर्थिक, धार्मिक क्षेत्रापासून तिला दूर ठेवण्यात आले. स्त्रीवर पुरुषाचे कायम वर्चस्व राहावे यासाठी ही बंधने लादण्यात आली. या अन्यायी गुलामगिरीच्या रुढी प्रथा परंपरांना विरोध करून त्यांना स्वातंत्र्य व समता प्राप्त करून देण्यासाठी भारतातील अनेक समाजसुधारकांनी आवाज उठविला. वास्तविक ज्ञानार्जन करणे हे प्रत्येक मानवाचा जन्मसिद्ध हक्क आहे. ते कोणतेही कारण न देता मनुसंस्कृतीने स्त्रियांपासून हा हक्क हिरावून घेतला आहे. म्हणून महात्मा फुले व सावित्रीबाई फुले या दांपत्यांनी सर्वप्रथम मुलींसाठी १८४८ मध्ये पहिली शाळा काढून क्रांतिकारी पाऊल उचलले. २० व्या शतकात महर्षी धोंडो केशव कर्वे, गोपाळ गणेश आगरकर, छत्रपती शाहू महाराज यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी खऱ्या अर्थाने स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार केला. तसेच स्त्री-समाजसुधारकांनीही स्त्रियांच्या अत्याचाराला वाचा फोडून स्त्रियांचे प्रश्न अन्याय जगासमोर आणले. स्त्री-पुरुष समानतेचा आग्रह धरला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी प्रत्यक्ष राज्यघटनेत कलम १५ नुसार स्त्री-पुरुष समानता आणली. या अथक परिश्रमानंतर भारत सरकारच्या शिक्षणाचा प्रचार व प्रसार यामुळे स्त्रीशिक्षणाचे प्रमाण वाढले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात निश्चित यात थोड्याफार प्रमाणात जागरूकता आली. शहरातील तसेच ग्रामीण भागातसुध्दा स्त्रीशिक्षणाबद्दल जागृतता आली. आर्थिक दृष्टीने संपन्न व शिक्षणाचे संस्कार झालेल्या कुटुंबातील मुली शिकू लागल्या व त्यांनी जीवनातील आतापर्यंत पुरुषांचे क्षेत्र समजल्या जाणाऱ्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. विविध क्षेत्रातली कला, क्रीडा, संशोधनापासून ते राजकीय क्षेत्रातील राष्ट्रपतीपदापर्यंतचा प्रवास, पल्ला स्त्रियांनी गाठला. असे कोणतेच क्षेत्र नाही जिथे स्त्रिया पोहचू शकल्या नाहीत. पण असे म्हणता येईल का की स्त्री-सबलीकरण झाले? स्त्रियांचे प्रश्न मोठ्या प्रमाणात संपले? स्त्रीविकासासाठी अनुकूल संधी मिळत आहे. स्त्रियांना सुरक्षा व समाजात योग्य स्थान प्राप्त झाले आहे, तर निश्चितच तसे न दिसता आज स्त्रियांचे स्थान, सुरक्षितता व विकास तसेच सर्व क्षेत्रातील त्यांचा सहभाग यामध्ये भयंकर परिस्थिती दिसून येते. वरचेवर स्त्रियांवर होणारे अत्याचार प्रत्येक २८ मिनिटाला, बलात्कार प्रत्येक ३४ मिनिटाला, लैंगिक अत्याचार प्रत्येक ४२ मिनिटाला, बालिका हत्या हा स्त्रियांच्या अवनतीचा बोलका पुरावा पाहता असे वाटते की, स्त्रियांचे खऱ्या अर्थाने सबलीकरण झाले का? अनेक वर्षांपासून स्त्रीसबलीकरणासाठी प्रयत्न करण्यात येत होते. त्याला कितपत यश आले? स्त्री-सबलीकरणासाठी सभा-संमेलने भरवली जातात पण त्या खऱ्या अर्थाने राबविल्या गेल्या आहेत का? त्यातून किती स्त्री-विकास झाला. याचा विचार करण्याची गरज आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ६४ वर्षांच्या कालखंडानंतर भारताचा विज्ञान तंत्रज्ञान आर्थिक विकास मोठ्या प्रमाणात झाला. भारत हे विकसनशील व प्रगत राष्ट्र आहे असे संबोधले जाते. तसेच येणाऱ्या वर्षात भारत महासत्ता बनेल असे स्वप्न आपण माजी राष्ट्रपतीबरोबर पाहिले पण या देशातील स्त्रियांना दुय्यम स्थान देवून त्यांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करून आर्थिक, सामाजिक, राजकीय दृष्टीने त्या मागे

सामाजिक सशक्तीकरण होऊ शकते जेव्हा या योजनेच्या अंतर्गत असलेला भ्रष्टाचार, वैयक्तिक स्वार्थ दुराग्रह यापासून योजन मुक्त होतील.

७३ वी ७४ वी घटनादुरूस्ती करून स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांना ३३% आरक्षण देण्यात आल्यामुळे संसदेपर्यंत त्यांचा प्रवे संभव झाला आहे. तसेच मतदानाच्या प्रक्रियेत भाग घेणे सरपंचापासून ते जिल्हा प्रमुखापर्यंत आणि संसदेतून मुख्यमंत्री पदासाठी प्रयत्न के जात आहेत. पण त्याला अजून अपेक्षित यश आले नाही. ३३% आरक्षणामुळे ग्रामीण भागातून भारतीय समाजातील रुढी परंपरा यातून बाह पडून ग्रामीण नेतृत्व पुढे येत आहे. याचाच परिणाम म्हणून आता स्त्रिया पंचायतीच्या कामकाजामध्ये प्रत्यक्ष पध्दतीने सहभागी झाल्या आहे यामुळे तिला स्वत्वाची जाणीव होत आहे व आपल्या विकासासाठी प्रयत्नशील बनत आहे.

केंद्र सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये स्त्रियांना ५०% आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. पण सुधारणेच्य बाबतीत पुरोगामी म्हणून संबोधल्या जाणाऱ्या महाराष्ट्राने ते विधेयक संसदेत मंजूर व्हायच्या आधीच राज्य मंत्रिमंडळाने स्थानिक स्वरा संस्थेमध्ये स्त्रियांना ५०% आरक्षण ८ मार्च या महिला दिनाच्या दिवशी मंजूर केले.

राजकीय क्षेत्रातील स्त्रियांची कामगिरी पाहता ग्रामीण चित्र बदलत आहे. महाराष्ट्रामध्ये स्त्रियांचे जननप्रमाणे कमी असताना त्यां राजकीय सबलीकरण करण्यासाठी ५०% आरक्षण महत्त्वपूर्ण निर्णय आहे. ह्या पार्श्वभूमीवर ३३% आरक्षण राज्यसभेनंतर लोकसभेमध लवकरात लवकर पास होणे आवश्यक आहे. भारतीय राज्यघटनेने समता आणि बंधुभावाचे वैधानिक अभिवचन देऊन भारतीय लोकशाही स्वप्न पाहिले. त्यामुळे स्त्रियांमधील गुणवत्ता राजकारणासह काही प्रमाणात सर्व क्षेत्रात दिसत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेतील ग्रामीण नेतृत्व तेव्हाच यशस्वी होईल जेव्हा स्त्रियांतून ग्रामीण नेतृत्व पुढे येण्यासाठी स्त्री नेतृत प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करून तिला राज्यव्यवस्थेतील ज्ञान देण्यात येईल. त्यातूनच तिचे वैचारिक प्रबोधन होईल. यासाठी पुरुषां त्यांची पुरुषप्रधान मानसिकता सोडणे आवश्यक आहे. स्त्री सबलीकरणातूनच राष्ट्राच्या लोकसंख्येचा अर्धा भाग उत्पादनाच्या क्षेत्रात आणल जाईल. स्त्रिया त्यांच्या स्वाभाविकतेमुळेच पुरुषांपेक्षा सामाजिक बदलांचे चांगले माध्यम ठरू शकतात.

घरच्या चार भिंतीपासून ते अंतराळापर्यंतचा टप्पा स्त्रिया पार करू शकल्या ते त्यांच्या आंतरिक शक्तीमुळेच. या आंतरि शक्तीतूनच स्त्रियांनी स्वतःतील शक्ती आणि आकांक्षा यांना कोणीच रोखू शकत नाही, हे दाखवून दिले आहे. म्हणूनच स्त्रियांनी प्रथा परंपरेच्या जोखडांना तोडून विकासासाठी, आत्मसन्मानासाठी सतत कृतिशील राहिले पाहिजे. स्वतःवर लादलेले दुय्यमत्व स्त्रियांनी आपल्य कर्तृत्वातून घालविले पाहिजे. निसर्गाने सोपविलेली गर्भधारणा, प्रजनन, बालसंगोपन या नैसर्गिक जबाबदाऱ्या तसेच कुटुंबाचे नियोज घरातील सदस्यांची काळजी या साऱ्या सामाजिक जबाबदारी स्वीकारून तिला स्वतःला सिध्द करून दाखविण्याचे अलौकिक सामर्थ दाखविले पाहिजे व उंच शिखराकडे सोपवण्यासाठी स्वतःच पुढे आले पाहिजे.

## संदर्भ

१) महिला सबलीकरण वास्तव व व्यथा, महाराष्ट्र टाईम्स, दि.११ ऑक्टो. २०१६
२) www.artofliving.org महिला सशक्तीकरण
३) www.divyamarathi.bhaskar.com (महिला सशक्तीकरण रखडते कुठे?) दि.१० जून २०११
४) महिला समक्षमीकरणाचे वास्तव, लोकसत्ता, दि.०३ जाने. २०१५
५) महिलांचे सबलीकरण हे केवळ उदिद्ष्टच राहिले, दि.२३ नोव्हें. २०१३
६) mr.vikaspedia.in महिला कल्याणासाठीचे कायदे
७) देशाच्या विकासासाठी महिला सबलीकरणाचे धोरण आवश्यक, लोकसत्ता, दि.२६ जाने.२०१४

RESEARCH JOURNEY

Impact Factor 6.261

ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S
UGC Approved Multidiciplinary international E-research journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

Visit to - www.researchjourney.net SWATIDHAN PUBLICATION